**१५ वित्त आयोग अंतर्गत जाहिरात सन २०२४-२५**
**आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,अकोला**
**जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,अकोला**

03/03/2025

१५ वित्त आयोग अकोला अंतर्गत जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,अकोला यांच्या माध्यमातुन विविध पदे पुर्णतः कंत्राटी पध्दतीवर भरण्याकरिता अर्ज घेण्यात येत आहेत. सदरचे अर्ज टपालाने किंवा प्रत्यक्ष राष्ट्रीय आरोग्य अभियान, कार्यालय, जिल्हा परिषद कर्मचारी कल्याण भवन, आकाशवाणी समोर, अकोला येथे विहीत कालावधीत सादर करावे.

**१५ वित्त आयोग अंतर्गत नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र (हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे,आपला दवाखाना HBT करिता खालील रिक्त पदे भरणे करिता जाहिरात**

| अ. क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता | पद संख्या | प्रतिमहा मानधन | मुख्यालय | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Staff Nurse-Female | GNM/ B.SC Nursing | 5 | 20000/- | Balapur-2<br>Akot-2<br>Barshitakli-1 | SC-1<br>OBC-1<br>SEBC-1<br>OPEN-2 |

**१५ वित्त आयोग अंतर्गत नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र UHWC करिता खालील रिक्त पदे भरणे करिता जाहिरात**

| अ. क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता | पद संख्या | प्रतिमहा मानधन | मुख्यालय | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Staff Nurse-Female | GNM/ B.SC Nursing | 12 | 20000/- | Balapur-3<br>Akot-5<br>Murtizapur-2<br>Telahra-2 | SC-1<br>VJA/NTC-1<br>NTB/NTD/SBC-1<br>OBC-3<br>SEBC-2<br>EWS-1<br>OPEN-3 |
| 2 | MPW- Male | 12th Pass in Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course | 19 | 18000/- | Tq.Balapur-3<br>Tq.Akot-6<br>Tq.Patur-3<br>Tq.Barshitakli-2<br>Tq.Murtizapur-4<br>Tq.Telhara-1<br>**(HBT & UHWC Leval Post)** | SC-2<br>ST-2<br>NTB-1<br>OBC-1<br>SEBC-3<br>EWS-2<br>NTD/ SBC-1<br>OPEN-7 |

**१५ वित्त आयोग अंतर्गत ब्लॉक पब्लीक हेल्थ युनिट BPHU करिता खालील रिक्त पदे भरणे करिता जाहिरात**

| अ. क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता | पद संख्या | प्रतिमहा मानधन | मुख्यालय | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Entomologist | M.Sc. Zoology with 5 Year Experience | 7 | 40000/- | Akola-1<br>Akot-1<br>Balapur-1<br>Barshitakli-1<br>Murtizapur-1<br>Patur-1<br>Telhara-1 | SC-1<br>ST-1<br>VJA/NTB/NTC/NTD/SBC-1<br>OBC-1<br>SEBC/EWS-1<br>OPEN-2 |
| 2 | Public Health Manager | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health | 4 | 35000/- | Akola-1<br>Murtizapur-1<br>Patur-1<br>Telhara-1 | SC-1<br>ST-1<br>VJA/NTB/NTC/NTD/SBC-1<br>SEBC/EWS-1 |
| 3 | Lab Technician | DMLT<br>(with 1 Year Experience) | 9 | 17000/- | Akola-2<br>Akot-1<br>Telhara-2<br>Patur-2<br>Murtizapur-2 | SC-2<br>ST-1<br>NTB/NTD/SBC-1<br>OBC-2<br>SEBC-1<br>OPEN-2 |

**सुचना :**

१. उपरोक्त जाहिरात नुसार **Staff Nurse- Female** उमेदवारांनी अर्ज सादर करतांना १) **हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे,आपला दवाखाना HBT** किंवा २) **नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र UHWC** या दोन पैकी कोणत्या कार्यक्रमांतर्गत व कोणत्या प्रवर्गामध्ये अर्ज सादर करावयाचा आहे असे फॉर्म वर उमेदवारांनी स्पष्टपणे नमुद करण्यात यावे.

२. पदभरती जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हयाच्या संकेतस्थळावर www.akolazp.gov.in या **website** वर प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच पदभरती विषयक पुढील सुचनाही याच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

३. सदर पद राज्यशासनाची पद नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

४. पदांची संख्या गरजेप्रमाणे बदलण्याची शक्यता आहे पदांसाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे. पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, मानधन, सामाजिक आरक्षण, नियुक्तीचे ठिकाण, आवश्यकतेनुसार बदल करण्याचे सर्व अधिकार निवडसमितीला असतील.

५. सदरील पदे राष्ट्रीय आरोग्य अभियानाशी/राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाशी संबंधीत नाहीत,त्यामुळे भविष्यात सदरील योजना/कार्यक्रम बंद पडल्यास अथवा पदांना मंजुरी न मिळाल्यास त्यांना राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये/ राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानामध्ये समावुन घेण्याचा दावा करता येणार नाही.

६. मुलाखतीस उपस्थित राहतांना उमेदवाराने मुळ शैक्षणीक कागदपत्रे तसेच नोंदणी प्रमाणपत्रासह हजर राहणे आवश्यक राहील. मुलाखतीकरिता उपस्थित राहण्यासाठी कुठलाही प्रवास/दैनंदिन भत्ता दिला जाणार नाही.

७. उच्च शैक्षणिक अर्हता धारकांस व अनुभव असलेल्या उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल. निवड झालेल्या उमेदवारांस सुरुवातीला ११ महिणे २९ दिवस नेमणुक दिली जाईल.या कालावधीत केलेले काम समाधानकारक असल्यास नेमणुकीचा कालावधी वाढविण्याची शक्यता आहे. काम असमाधानकारक असल्यास कामावरुन कमी करण्यात येईल.

८. उमेदवाराची निवड झाल्यावर जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,अकोला यांच्याकडे रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा भरुन देणे बंधणकारक राहील.

९. भरती प्रक्रिया संबंधी सर्व अधिकार तसेच अर्ज स्विकारणे,नाकारणे अथवा भरती प्रक्रिया संपुर्णपणे रद्द करण्याचा अधिकार,अध्यक्ष,निवड समिती यांनी राखुन ठेवले आहे.

१०.अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

११.केंद्र अथवा राज्य शासनाकडुन संबंधित पद नामंजुर झाल्यास उमेदवारांस कोणतीही पुर्व सुचना न देता संबंधित उमेदवाराची सेवा तात्काळ संपुष्टात येईल.

१२. सदर पदांकरीता तत्सम कौन्सिलकडुन वैध (चालु) असलेले रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

१३.नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांना कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१४.सेवानिवृत्त विशेषतज्ञ/कर्मचारी यांचे निवड झाल्यास सदर पदांकरीता मानधन राज्य स्तरावरुन प्राप्त विहीत मार्गदर्शक सुचनांनुसार अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१५.जाहिरातीच्या दिवशी सदर पदाकरिता कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ व मागासवर्गीयांसाठी ४३ राहील.

१६.उपरोक्त पदाकरिता अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतीसह दि. 17/03/2025 **रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत** कार्यालयीन वेळेत **राष्ट्रीय आरोग्य अभियान, कार्यालय, जिल्हा परिषद कर्मचारी कल्याण भवन, आकाशवाणी समोर, अकोला** येथे पोष्टाव्दारे अथवा स्वतः सादर करावा. पोष्टाव्दारे विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१७.उपरोक्त पदाकरिता अर्जदाराने **A4** आकाराच्या कागदावर सोबत जोडलेल्या विहित नमुण्यातच अर्ज करावा. उमेदवाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका , जातीचा दाखला/ जात वैधता प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा/ जन्मतारखेचा दाखला, प्रमाणित केलेले कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्राच्या सांक्षाकित केलेल्या प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज विचारात घेतेले जाणार नाही. ज्या प्रमाणपत्रामध्ये **Grading System** नुसार मार्क असतील त्यांनी संबंधित प्रमाणपत्रामागील **Grade Card** झेरॉक्स अर्जासोबत जोडण्यात यावी.

१८.उमेदवारांनी ज्या प्रवर्गात अर्ज करावयाचा आहे त्याच प्रवर्गाच्या एकाच रकान्यात टिक मार्क करावी. दोन पेक्षा जास्त संवर्गात टिक मार्क असल्यास सदर अर्ज नाकारल्या गेल्यास यास उमेदवार जबाबदार राहील.

१९.उमेदवारांने अर्ज सादर केलेल्या पदांशी निगडीत संबंधित उमेदवारास अनुभव असल्यास सदरील अनुभव ग्राहय धरण्यात येईल. व नियमावलीनुसार गुण देण्यात येईल . तसेच अनुभव प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. इतर क्षेत्रातील सदर पदाशी निगडीत नसलेला अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही.

२०.उमेदवाराकडुन अर्धवट ,अपुर्ण, वाचण्यायोग्य नसलेला अर्ज किंवा शैक्षणिक कागदपत्रे अस्पष्ट प्रती असल्यास संबंधीत उमेदवारांचा अर्ज नाकारला गेल्यास अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी ही उमेदवाराची राहील.

२१.राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सद्यस्थिती कार्यरत असलेल्या उमेदवारास मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक , राआअ मुंबई यांचे दि. २८/०५/२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार अ) एमबीबीएस,विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेषज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्षे राहील. ब) रुग्ण सेवेशी संबंधीत इतर पदांची वयोमर्यादा ६५ वर्ष राहील. वय वर्ष ६० नंतर प्रत्येक वर्षी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतरच पुर्ननियुक्ती आदेश देण्यात येतील. त्याकरिता उमेदवारांनी अनुभव प्रमाणपत्रामध्ये आजतागायत (Till Date) कार्यरत असल्यांच्या बाबीचा उल्लेख असणे आवश्यक राहील.

२२.उपरोक्त नमुद प्रसिध्द पदभरती जाहिरातीमधील अपेक्षीत राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास राखीव जागेवर खुल्या प्रवर्गातुन उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती दिल्या जाईल तसेच संबंधीत राखीव प्रवर्गातील उमेदवार प्राप्त झाल्यानंतर सदरची तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेली नियुक्ती संपुष्टात करण्यात येईल.

२३.शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. खाजगी अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही.

२४.उपरोक्त पदभरती बाबत असलेल्या सर्व सुचना (प्राथमिक पात्र / अपात्र उमेदवारांची यादी , आक्षेप स्विकारणे, अंतिम पात्र/अपात्र, संभाव्य निवड झालेल्यांची यादी, मुलाखत असल्यास मुलाखत दिनांक, इत्यादी सर्व बाबी हया www.akolazp.gov.in या **website** वर प्रकाशित करण्यात येईल. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

२५.या कार्यालयाकडुन उपरोक्त पदभरती बाबत महत्वाच्या सुचना उमेदवारांच्या दुरध्वणी क्रमांकावर पाठविण्यात येतील. करिता संपुर्ण भरती प्रक्रिया होईस्तोवर उमेदवारांनी दुरध्वणी क्रमांक बदलविण्यात येऊ नये.आवेदनावर स्वतःचा दुरध्वणी क्रमांक अचुक व स्पष्ट नमुद करण्यात यावा. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

२६. खूल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१५०/- व राखिव प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१००/- चा कोणत्याही **Nationalized** बँकेचा डिमांड ड्राप्ट जोडणे आवश्यक आहे व डिमांड ड्राप्ट च्या मागे स्वतःचे नाव व कोणत्या पदासाठी अर्ज सादर केला त्या पदाचे नाव स्वहस्ताक्षरात लिहावे, सदरचा डिमांड ड्राप्ट **"DIST INT HEALTH AND FAMILY WELFARE SOCI AKOLA NON PIP ACC"** या नावे अकोला या शाखेवर देय असलेला असावा.

**<u>खालील उणिवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील :</u>**

१) विहीत पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज.

२) विहीत नमुन्यात नसलेले किंवा योग्य प्रकारे न केलेले अर्ज तसेच उशीराने कार्यालयास प्राप्त अर्ज.

२) मजकुर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज,खाडाखोड केलेला अर्ज.

३) स्वाक्षरी नसलेले,आवश्यक गुणपत्रकांच्या व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती नसलेले अर्ज अगर तत्सम वरील प्रमाणे कोणत्याही बाबतीत त्रृटी असल्यास आपला अर्ज नाकारण्यात येईल व त्याबाबतीत आपल्याशी कोणताही पत्रव्यवहार केला/स्वीकारला जाणार नाही.

४) दि. २३/०७/२०२० च्या परिपत्रकानुसार दोन पेक्षा अधिक हयात मुले असणाऱ्या उमेदवारांचे अर्ज अपात्र करण्यात येईल. तसेच अर्जा सोबत लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

५) मुलाखत दिनांकामध्ये बदल करण्याचे अधिकार खालील स्वाक्षरीकर्त्यांनी राखुन ठेवलेले आहे.

टिप : उपरोक्त पदसंख्येत बदल करणे तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखून ठेवलेले आहेत.

**उपरोक्त नमुद पदाकरिता गुणांकन पद्धतीनुसार निवड प्रक्रिया खालील प्रमाणे राहील.**

| विवरण | तपशिल | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदाकरिता आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion राहील. (उदा - ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = 60*50/100=30 ) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास ( संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घेण्यात येईल) | अधिकतम २० गुण राहील. मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० % प्रमाणे Proportion काढण्यात येईल. (Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पुर्ण करुन अतिरीक्त B.Sc (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे proportion = 60 * 20/100 = 12 गुण ) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण देण्यात येईल ( १ वर्षाकरिता ६ गुण , जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकुण १०० गुण |

सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रर्वग निहाय गुणांकन यादी तयार करण्यात येईल. गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारास समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच गुणांकन व वय देखील समान असल्यास संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

**सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,**
**सोसायटी, जिल्हा परिषद, अकोला**

**अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण**
**जिल्हा परिषद, अकोला**

१५ वित्त आयोग अंतर्गत जाहिरात सन २०२४-२५
आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,अकोला
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,अकोला
कंत्राटी पदभरती

**अर्जाचा नमुना**

............................... या पदासाठी अर्ज

प्रती,
अध्यक्ष,
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कु.क सोसायटी
जि.प. अकोला

१) उमेदवाराचे नाव :- संपुर्ण नाव

मराठी मध्ये (संपुर्ण नाव) :- ..........................................................

इंग्रजी मध्ये (संपुर्ण नाव) :- ..........................................................

२) उमेदवाराचा संपुर्ण पत्ता :- ..........................................................

............... ...............

................................

..................................पिन कोड..................

३) दुरध्वनी क्र :- ...................., ईमेल आयडी ..................................

४) जन्मतारीख :- ...................., दि.२४/०२/२०२५ रोजीचे वय:-....वर्ष....महिने

५) डि.डि क्रमांक:- .................... रक्कम :- .............. दि. ...............

६) जातीचा प्रवर्ग :- .................. , पोटजात :- ...............
(जातप्रमाणपत्राची छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक)

७) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे त्या प्रवर्गाच्या चौकटित टिक (**V**) करावी.

| अ.जा | अ.ज | विजा अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा.प्र | इ.मा.व | सशैमाप्र | आर्थिक मागास प्रवर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | SEBC | EWS | OPEN |
| | | | | | | | | | | |

८) शैक्षणिक अर्हता:-

| अ.क्र | परिक्षेचे नाव | विद्यापिठ/मंडळाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

(*पदांच्या शैक्षणिक अर्हते नुसार व उच्च शैक्षणिक अर्हतेनुसार सर्व गुणपत्रक/प्रमाणपत्राच्या छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक)

9) Registration Certificate - Yes / No ............. Registration Number ..............

१०)अनुभव :-

| अ.क्र | संस्थेचे नाव व पत्ता | पदाचे नाव | शासकिय | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासुन | पर्यंत | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

(* अर्जासोबत अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक)

११) जाहिरातीमधील पदाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार (आवश्यकतेनुसार लागु असल्यास) :-

| Course Name | Yes | No |
|---|---|---|
| Other Course (Please Specify) | | |
| | | |
| | | |

(*प्रमाणपत्राच्या छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक)

१२) अर्जासोबत खालील (छायांकित) प्रती जोडण्यात आलेल्या आहे. :-

(१) ..........................................................

(२) ..........................................................

(३) ..........................................................

(४) ..........................................................

(५) ..........................................................

(६) ..........................................................

(७) ..........................................................

(८) ..........................................................

उपरोक्त प्रमाणे मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती हि खरी असुन, ती खोटी आढल्यास माझी उमेदवारी नियुक्तिच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी

नाव............................

# प्रतिज्ञापन

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी..........................................................................

श्री.........................................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय..................वर्ष, राहणार,.........................................................................

याव्दारे असे जाहिर करतो / करते की,

१) मी................................................या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला...............................(संख्या) इतकी हयात मुले आहेत.त्यापैकी दिनांक २३ जुलै,२०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या........................ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

३) दिनांक २३ जुलै,२०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण

दिनांक

स्वाक्षरी

लिहुन देणार नांवः-